# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

**(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)**

दुरध्वनी क्रमांक (02482)-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com** **Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २१/०४/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** आपत्ती प्राधान्य

वाचाः- १. साथरोग प्रतिबंध कायदा १९८७ चे कलम २,३ व ४
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
३. राज्य शासनाचे एकत्रित सुधारीत मार्गदर्शक तत्वे दिनांक १७.०४.२०२०
४. या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक १७.०४.२०२०
५. या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक २०.०४.२०२०

## सुधारीत आदेश

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोवीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात प्रतिबधात्मक करणेसाठी राज्य शासनाने दिनांक १७.०४.२०२० अन्वये एकत्रित सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्ममित केली आहेत.

त्याअर्थी मी रविंद्र बिनवडे,जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जालना करोना विषाणूचा संसर्ग वाढू नये यासाठी महाराष्ट्र शासनाने संपूर्ण राज्यात दिनांक ०३.०५.२०२० पर्यत पूर्ण लॉकडाऊन घोषित केलेले आहे. तथापी माझे असे निदर्शनास आले आहे की, नागरीकांची अत्यावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी गैरसोय होण्याची शक्यता आहे. संदर्भ क्र.५ वरील आदेशात खालील प्रमाणे अशंतः सुधारणा करण्यात येत आहे.

त्याअर्थी, मी **रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** आदेशीत करीत आहे की, जालना शहरातील नागरीकांनी अत्यावश्यक वस्तूंची खरेदी दिनांक २१.०४.२०२० रोजीपासून पुढील आदेशापावेतो अत्यावश्यक असेल तरच सकाळी ७.०० ते दूपारी २.०० या कालावधीतच करावी. या कालावधीत फक्त दुध विक्री, फळे व भाजीपाला विकी, किराणा दुकाने, पिठाची गिरणी, कृषी निविष्ठा (बि-बियाणे, खते, किटकनाशके), कृषी अवजारे, पेट्रोलपंप ही दुकाने चालू राहतील. इतर सर्व दुकाने बंद राहतील. जिल्हयात इतर सर्व ठिकाणीसुध्दा वरील कालावधीत केवळ अत्यावश्यक सेवेचीच दुकाने चालू राहतील व इतर सर्व दुकाने बंद राहतील.

तसेच जिल्हयातील सर्व रुग्णालये, दवाखाने, चिकित्सालये, पशूवैद्यकीय दवाखाने, औषधी दुकाने (मेडीकल) व घरगुती गॅस (Home Delivery सह) यांना वरील आदेश लागू होणार नाही.

जालना जिल्हयातील नागरिकानी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहर पडू नये अन्यथा जिल्हयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहितेच कलम १४४ आदेशाचे पालन न करणा-या नागरीकावर कडक कार्यवाही करण्यांत येईल.

(रविंद्र बिनवडे) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना

प्रत- (माहिती तथा कार्यवाहीस्तव)
१. पोलीस अधीक्षक, जालना.
२. सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल) जि.जालना.
३. सर्व तहसीलदार जि.जालना.
४. सर्व मुख्याधिकारी नगर परिषद / नगर पंचायत जि.जालना.
५. सर्व संबंधीतास.
५. जिल्हा माहिती अधिकारी, माहिती कार्यालय, जालना यांना प्रसिध्दीस्तव.